# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## सामान्य काळातील सहावा रविवार

## १४ फेब्रुवारी २०२१

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू : बंधू आणि भगिनी म्हणून ख्रिस्ताठायी आपण एकत्र जमलो आहोत. प्रभूने आपल्यावर केलेल्या अनेक उपकारांची आपण आठवण करू या. प्रार्थना करण्यास परमेश्वर आपल्याला स्फूर्ती देतो. अखिल मानव जातीवरील परमेश्वराच्या प्रेमावर विश्वास ठेवून आपण आपल्या प्रार्थना त्याच्या चरणी अर्पण करू या.

प्रतिसाद : **प्रभो, आमची प्रार्थना ऐक.**

१. आपले पोप फ्रान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना प्रभूचा आरोग्यदायी स्पर्श भाविकांपर्यंत पोहचविण्यास कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपल्या राजकीय नेत्यांनी निस्वार्थीपणे देशाची व देशवासीयांची सेवा करावी व त्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. आजच्या शुभवर्तमानात प्रभू येशू ख्रिस्त कृष्ठ रोग्याला स्पर्शाने बरे करतो. प्रभूच्या स्पर्शाने ह्या पवित्र मिस्साबलिदानातील शरीर व रक्ताद्वारे आपणास आरोग्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. आपल्या समाजात जे वयोवृद्ध, अपंग व विकलांग आहेत अशाना प्रभूचा विशेष आशीर्वाद मिळावा त्यांना इतराप्रमाणे मानाचे व आनंदाचे जीवन जगता यावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. प्रभूच्या सामर्थ्यशाली कृपेचा स्पर्श गरीब, आजारी, निराश्रित व निराधार लोकांना घडावा, कोरोना विषाणुपासून व सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्तीपासून आपले रक्षण व्हावे तसेच उद्या / आज विवाहबद्ध होणा-या वधूवरांवर परमेश्वराचा आशीर्वाद यावा म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडावेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक हेतूंसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू : हे प्रेमळ परमेश्वरा, तू आमचा आधार आणि सामर्थ्य आहेस. आमच्या जीवनातील सर्व गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन